प्रेसनोट –

## सुरक्षारक्षकाचा खून करणा-यास अटक

## भारती विद्यापीठ पोलीसांचा कौशल्यपुर्ण तपास.

दिनाक.२७/०७/२०१७ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले सो व पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे सो यांच्या आदेशाने भारती विदयापीठ पो.स्टे पुणे शहर गु.र.न. ४८/२०१८, भां.द.वि.कलम.३०२,२०१ मधील आरोपीचा शोध पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते व तपास पथकातील कर्मचारी घेत असताना

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन चे कर्मचारी अमोल पवार व कुंदन शिंदे यांनी विविध तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करुन त्यातून प्राप्त एका लहान मुलाची छबी संपुर्ण कात्रज परिसरात फिरून, त्यांचे बातमीदारांना दाखवून सदर लहान मुलाची ओळख पटविली त्यावरून ज्या अज्ञात इसमाने खून केला आहे.तो शकील बाबु तांबोळी असल्याचे निष्पन्न केले. शकील तांबोळी व त्याचे वडील ज्या ठिकाणी खुन झाला त्या रतन मोटर्स या ठिकाणी कंपनीत पुर्वी सुरक्षारक्षक म्हणून काम करत होते.गुन्हा केल्यानंतर तीन दिवस आरोपी सतत ठिकाणे बदलत होता.सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना पो.उप.निरी.श्री.दत्ताजीराव मोहिते यांचे पथकातील पो.हवा.फ़डतरे यांना सदरचा आरोपी धानोरी भागात असल्याची माहीती मिळाली आरोपीचा शोध घेण्याकामी पोलीस स्टेशन स्तरावर ०४ पथके तयार करण्यात आली होती.पोलीस उप-आयुक्त कार्यलयातून पोलीस कर्मचारी सचिन ढवळे यांनी आरोपीच्या ठावठिकांणाबाबत सर्व तांत्रिक माहीती अवगत केल्याने **आरोपी नामे शकील बाबु तांबोळी वय-३५ वर्षे,धदां-सिक्युरीटी,रा-सध्या.धानोरी, गोकुळनगर, टिंगरे यांची चाळ, विश्रांतवाडी नं.१५.पुर्वी शिवापुरवाडा कोंढणपुर फाटा** यास अत्यंत कौशल्याने धानोरी भागातून ताब्यात घेतले.त्याचेकडे त्याला विश्वासात घेवून चौकशी करता शकील तांबोळी हा पुर्वी रतन मोटर्स येथे वॉचमन म्हणून काम करीत होता. घटने दिवशी मयत आरिफ पठाण याचेबरोबर सांयकाळी झालेल्या तत्कालीन वादातून त्याने आरिफखान पठाण याचा दि.२७/०१/२०१८ रोजी रात्रीचे वेळी त्याचे अल्पवयीन मुलाच्या साथीने भंगार चोरी करण्यासाठी सूरक्षारक्षकाचा अडथळा होउ नये यासाठी शकील तांबोळी याने त्याचा खुन केल्याचे कबुल केले.सदर आरोपीस दाखल गुन्हाचे कामी आज दि.३१/०१/२०१८ रोजी १०.३० वा.अटक करण्यात आली असून त्याच्या अल्पवयीन मुलास गुन्ह्याचे कामी ताब्यात घेण्यात आले आहे. खुनाच्या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी आरोपीने शिवापुर येथील घर सोडून तो धानोरी परिसरात राहण्यास गेला होता.

सदरचा तपास करीत असताना रविवार. दि.२८/०१/२०१८ रोजी घटना उघडकीस आल्यापासून पोलीसांनी सलग ७२ तास अत्यंत कौशल्याने तपास करीत सदरच्या आरोपीस अटक केली आहे.

सदर कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो. दक्षिण प्रादेशिक विभाग रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त मा. प्रविण मुंडे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले , पोलीस निरीक्षक(गुन्हे) वाघचवरे तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते,शिवदास गायकवाड,कर्मचारी चंद्रकांत फडतरे,कृष्णा निढाळकर,सचिन ढवळे, अमोल पवार, कुंदन शिदे, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, सरफराज देशमुख, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, गणेश चिंचकर,शिवदत्त गायकवाड,जगदिश खेडेकर,विनोद भंडलकर,पोलीस मित्र योगेश बळी यांनी केलेली आहे